# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २३७ वा शुक्रवार दि.२३ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# भादा सर्कलमधील अनेक सरपंचाचा भाजपात प्रवेश लोकसभेसह विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची पाट लावणार - आ कराड





लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कलमधील भादा, येल्लोरी, कवठा केज, बऱ्हाणपूर, वडजी, काळमाथा, बोरगाव न. यासह विविध गावचे सरपंच, उपसरपंच इतर आजी माजी लोकप्रतिनिधींनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. केलेल्या विकास कामाच्या जोरावर आणि गोरगरीब जनतेच्या आशीर्वादाने येणाऱ्या लोकसभा निवडणुकीसह लातूर ग्रामीण विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाची पाट लावल्याशिवाय राहणार नाही असे यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात येणाऱ्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथे भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा आणि भाजपा पक्ष प्रवेश भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि जिल्ह्याचे खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सायंकाळी भादा येथे पार पडला. यावेळी मोदी आवास योजनेतील घरकुल, अहिल्यादेवी होळकर सिंचन योजनेअंतर्गत विहीरी, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना पशुधन गोठा यासह विविध योजनेतील पात्र आणि गरजू लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, प्रदेश भाजपाचे अनिल भिसे, सतीश आंबेकर, भाजपाचे रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संगायो समितीचे लातूर तालुका अध्यक्ष वैभव सापसोड, रेणापूर तालुका अध्यक्ष वसंत करमुडे, सुधाकर गवळी, उमेश बेद्रे, फुलचंद अंधारे, महादेव मुळे, पद्माकर चिंचोलकर, गुणवंत कारंडे, राजकीरण साठे, रवींद्र पाटील, उद्धव काळे, बालाजी साळुंखे, सतीश कात्रे, सुधीर मोहीते यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. भादा गावात आगमन होताच आ. कराड आणि खा. शृंगारे यांचे ढोल ताशाच्या गजरात फटाक्याची आतिषबाजी करत जोरदार स्वागत करण्यात आले. या मेळाव्यास भादा आणि परिसरातील अनेक गावच्या महिलांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

भाजपाच्या मेळाव्यात भादा येथील सरपंच मीनाताई दरेकर, उपसरपंच बालाजी शिंदे, माजी सरपंच दिनकर माळी, पांडुरंग कात्रे, माजी चेअरमन नंदकुमार जाधव, महादेव पाटील, येल्लोरी येथील सरपंच धोंडीराम लखादिवे, उपसरपंच सोमेश्वर येरटे, सागर पाटील, बसवेश्वर बिराजदार, नितीन रिंगणकर, कवठा केज येथील सरपंच गिरीधर पवार, उपसरपंच अरुण व्हदाडे, माजी सरपंच दत्तू गोरे, तंटामुक्ती अध्यक्ष अण्णासाहेब व्हदाडे, बापूबिरू वाटेगावकर प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष प्रशांत गोरे, विश्वनाथ गुट्टे, पांडुरंग गोरे, श्रीकांत जाधव, मंगलबाई गोरे, रंजना आघाव, बऱ्हाणपूर येथील सरपंच अनिल मोरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष रामानंद स्वामी, व्हा. चेअरमन गुरुलिंग ढगे, माजी सरपंच पांडुरंग उबाळे, परमेश्वर मिटकरी, बळी कांबळे, सतीश चव्हाण, वडजीचे सरपंच महादेव गुरुशेट्टे, उपसरपंच शेख अकबर हैदर, उमराव शेख, जिलानी नवाज, शब्बीर आलम, हमजा पठाण, शहाबुद्दीन शेख, रजाक शेख, मुस्तफा शेख, अन्सार शेख, बाबामिया शेख, काळमाथा येथील उपसरपंच श्यामकिरण शेळके, माजी सरपंच मधुकर घाटूळे, सोपान शेळके, बालाजी कांबळे, तात्याराव गायकवाड, विश्वनाथ अडसुळे, अविनाश पाटील, बोरगाव - नकुलेश्वर येथील डॉ. व्यंकट रसाळ, व्हाईस चेअरमन संग्राम जाधव, माजी सरपंच वामन अवचार, बाळासाहेब कटारे, पंडित पाटील, विजयनंद साळुंखे, नानासाहेब रोंगे, सोमनाथ उबाळे, आंदोरा येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष शिकूर बशीर पठाण, पाशा पठाण, सोहेल पठाण, फरीद शेख, सलीम पठाण, वाजिद पटेल, धनराज जावळे, सलमान पठाण, अल्लू पठाण यांच्यासह त्या त्या गावातील ग्रामपंचायत आणि सोसायटीचे सदस्य, विविध लोकप्रतिनिधी, काँग्रेस व इतर पक्षातील पदाधिकाऱ्यांसह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

खरा विकास कोण करू शकतो याची खात्री पटल्याने अनेक जण भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. ज्या विश्वासाने भादा सर्कल मधील अनेकांनी प्रवेश केला त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या भागातील गावागावात वाडी वस्तीत शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. यापुढील काळातही जनहिताची कामे सांगा निश्चितपणे केली जातील मला काही घरचे सोयाबीन विकून करायचे नाही तर तुमचा अधिकार तुमच्यापर्यंत पोहोचवायचा आहे. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस आमदारांनी या भागात किती कामे केली त्याहून अधिक कितीतरी पटीने मी गेल्या तीन वर्षात विकासाची कामे केली. जनतेची दिशाभूल करून विकास कामाचे श्रेय लाटण्याचा केविलवाणी प्रयत्न लातूर ग्रामीणच्या आमदाराकडून होत असल्याचे सांगून या पुढील काळात दबावाचे आणि आडवणूकीचे राजकारण खपवून घेतले जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला. आपल्या गावाच्या परिसराच्या आणि देशाच्या हितासाठी लोकसभा निवडणुकीत भाजपाला मोठे समर्थन द्यावे, मोदीजींना आशीर्वाद द्यावे असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी केले.

केंद्रातील मोदीजींचे आणि राज्यातील महायुतीचे शासन सर्वसामान्य माणसाचा विचार करणारे आणि गोरगरिबांना दिलासा देणारे शासन आहे असे बोलून अनेक योजनेचा लाभ गरजू लाभार्थ्यांना देण्याचे काम होत आहे. गेल्या ७० वर्षात काँग्रेसला जे जमले नाही ते १० वर्षात मोदीजींनी करून दाखविले असे सांगून याप्रसंगी खा. सुधाकर शृंगारे यांनी केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. देश हितासाठी आणि सर्वांगीण प्रगतीसाठी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मोदीजींना भरभरून आशीर्वाद द्यावे असे आवाहन केले. भाजपात प्रवेश केलेले भादा येथील उपसरपंच बालाजी शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, राजकारण साठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेवणसिद्ध आप्पा महाराज पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले शेवटी पद्माकर चिंचोलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## व्ही एस पँथर्स च्या वतीने छत्रपतीं शिवाजी महाराज यांना अनोख्या पध्दतीने अभिवादन



लातूर : व्ही एस पँथर्स च्या सोनाई चौक,वीर भगतसिंग चौक शाखेच्या वतीने शिवजन्मोत्सव समारोह आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक गोसावी साहेब,पोलीस निरीक्षक बावकर साहेब, डॉ मेघराज चावडा ,रेल्वे तिकीट निरीक्षक गोविंदराव ढगे,हे उपस्थित होते. तर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के, ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे, संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हाध्यक्ष शरद किणीकर, जिल्हाध्यक्ष विशाल गायकवाड, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ विधी विभाग जिल्हाध्यक्ष प्रतिक कांबळे, राजेश सुवर्णकार यांची प्रमुख उपस्थिती होती .यावेळी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिवजन्मोत्सव निमित्ताने रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता ,सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रुग्णवाहिकेचे लातूरकरांसाठी लोकार्पण करण्यात आले . या वेळी विनोदभाऊ नी बोलताना सांगितले की महापुरुषांना डोक्यावर न घेता डोक्यात घेऊन सामाजिक उपक्रम राबवून व्ही एस पँथर्स महापुरुषांना अभिवादन करत असते ,या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले त्यांचे जाहीर अभिनंदन केले . यावेळी संतोष जाधव (ग्रुप शहराध्यक्ष),राज तरकसे (रेणापूर तालुकाध्यक्ष), सुनिल सातपुते (औसा तालुकाध्यक्ष),धनराज सुरवसे, मनोज कांबळे, मोनेश्वर पांचाळ, बबलू शेख, बबलू कांबळे, अमन शेख, श्रीकांत आदमने, सिद्धेश्वर कोळंबे, पांडुरंग बंडगर, सिद्धेश्वर जाधव, अतुल बंडगर, हनुमंत साळुंखे, सचिन शिंदे, व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते या रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा यशस्वी पार पाडण्यासाठी संघटनेचे मार्गदर्शक ॲड संतोष मांदळे सोनाई चौक शाखेवरील शाखाप्रमुख मोहन पांचाळ मनोज कांबळे, श्रीकांत आदमाणे, सिद्धेश्वर कोळंबे, सिद्धेश्वर जाधव,धनराज सोनटक्के, अशोक सोनटक्के, अमन शेख ,बबलू शेख,लक्ष्मण मांदळे ,आर्यन मांदळे, रत्नकुमार कांबळे, रोहित शेळके इत्यादी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले








भा. ई. नगराळे स( माजी जिल्हाधिकारी तथा उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ) यांनी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची गुलबर्गा येथे सदिच्छा भेट घेऊन आपल्या कार्याचा आढावा दिला याप्रसंगी मोईज भाई शेख ( सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ) हे उपस्थित होते.

## संपादकीय....

# ग्लॅमरची फोडणी..!

यशस्वी जैस्वाल या नवोदित क्रिकेटपटूने नुकतीच दोन कसोटी सामन्यांमध्ये दोन शतके लगावली आहेत. त्याच्या खेळण्याच्या शैलीमुळे भलेभले दिग्गज माजी कसोटीपटू भारावून गेलेले आहेत. याचा अर्थ यशस्वी हा भारताच्या क्रिकेट क्षितिजावर उगवलेला नवीन तारा आहे. एखादी व्यक्ती यश मिळवून माध्यमांमध्ये त्याची चर्चा सुरू झाली की, ती राहणार कुठली आहे किंवा पूर्वी काय करत होती, याची माहिती काढली जाते. यशस्वी जैस्वालने कधीच पाणीपुरीचा ठेला लावलेला नाही, हे सांगता-सांगता त्याचे प्रशिक्षक ज्वाला सिंग यांच्या नाकी नऊ आले आहेत. यशस्वी जैस्वाल पाणीपुरी विकत होता, अशी काहीशी बातमी कोणीतरी सोडून दिली आणि मग यशस्वी जैस्वालच्या क्रिकेटमधील कामगिरीपेक्षा त्याच्या पाणीपुरी विकण्याला ग्लॅमर प्राप्त झाले. रिक्षावाल्याची मुलगी आयएएस झाली किंवा प्लंबरची मुलगी पोलीस इन्स्पेक्टर झाली या बातम्या लक्ष वेधून घेणार्या असतात. अत्यंत गरिबीत जीवन कंठणार्याने उत्तुंग असे यश मिळवले की, लोकांना त्याचे कौतुक वाटणे सहाजिक आणि स्वाभाविक आहे, त्यात काही चूक नाही. त्याचबरोबर अतिश्रीमंतीचेही कौतुक असते. उदाहरणार्थ, शुभमन गिल हा क्रिकेटपटू एका धनाढ्य जमीनदाराचा मुलगा आहे, याचीही भरपूर चर्चा झाली होती. या पार्श्वभूमीवर यशस्वी जैस्वालचे पाणीपुरी विकणे चर्चेत आले नसते तरच नवल होते. त्याने खरेच पाणीपुरी विकली असती तर तशी चर्चा व्हायला हरकत नव्हती; पण यशस्वीची कहाणी मात्र वेगळीच आहे. त्याच्या वडिलांचे उत्तर प्रदेशातील एका छोट्याशा गावात हार्डवेअरचे दुकान आहे. त्यांना यशस्वीसहित एकूण सहा मुले आहेत. यशस्वी हा त्यांचा चौथा मुलगा. हा मुंबईमध्ये त्याच्या काकांकडे राहण्यासाठी आला. तिथे त्याने पडेल ती कामे केली. क्वचित प्रसंगी आझाद मैदानावरसुद्धा झोपला. तिथे तो मित्रांबरोबर क्रिकेट खेळत असे. क्रिकेट खेळून झाल्यानंतर तो मित्रांबरोबर पाणीपुरी खायला जात असे, एवढाच काय तो त्याचा आणि पाणीपुरीचा संबंध आहे. ज्वाला सिंग यांची सांताक्रूज येथे क्रिकेट अकादमी आहे. त्यांनी एकदा यशस्वीला क्रिकेट खेळताना पाहिले आणि त्याच्यामध्ये एक वेगळी गुणवत्ता आहे, हे त्यांच्या लक्षात आले. २०१३ मध्ये यशस्वीच्या वडिलांनी ज्वाला सिंग यांना त्याला क्रिकेट शिकवण्याची विनंती केली. ते म्हणाले की, त्याच्याकडून मेहनत करून घ्या, वाटेल ती कामे करून घ्या; पण याचा शिष्य म्हणून स्वीकार करा. ज्वाला सिंग यांनी यशस्वीला आपल्या अकादमीत भरती करून घेतले. यशस्वीला जवळपास दत्तक घेतल्यासारखे त्यांनी त्याची पॉवर ऑफ ऑफ अटर्नीही स्वतःकडे घेतली. तशी कागदपत्रे करून घेतल्यानंतर यशस्वीचे कठोर प्रशिक्षण सुरू झाले. यशस्वीचे वडील प्रशिक्षक ज्वाला सिंग यांना दर महिना एक हजार रुपये पाठवत असत. २०१३ मध्ये प्रशिक्षणास सुरुवात केलेला यशस्वी खर्या अर्थाने यशस्वी होण्यासाठी २०२४ साल उजेडावे लागले.अशी संघर्षाची पार्श्वभूमी बर्याच खेळाडूंची, गायकांची, संगीतकारांची, अभिनेत्यांची असते. त्याला जर गरिबीचे ग्लॅमर असेल, तर ती अधिक झळकून निघते. प्रत्येक गोष्टीची जाहिरात करणे आणि बातमीकडे लक्ष वेधून घेणे यासाठी काय केले जाईल, याचा काही नेम नाही.

# महान कर्मयोगी संतश्रेष्ठ गाडगे महाराज!

(संतश्रेष्ठ गाडगे महाराज जयंती सप्ताह विशेष.)

संतशिरोमणी गाडगे महाराज

हे ईश्वर कशात आहे, ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी । असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण ज्ञानवर्धक संकलित माहितीचा संत चरणधूळ: बापू-श्रीकृष्णदास निरंकारीजींचा सदर लेख चोखंदळ वाचकांच्या सेवेत... संपादक.

गाडगे महाराजांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील ता.दर्यापूर, शेंडगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी- मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी करायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे. सन १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता, दिलेली बगल होती. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्व जनांनी एकवटून केली पाहिजेत, हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला. दिनांक १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका, असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे; हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा- प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे, असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश- गाडगेबाबा



प्रबोधन काव्य- भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघड्यानागड्यांना = वस्त्र, गोरगरीब मुलामुलींना = शिक्षण, शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध, पंगू, रोगी यांना = औषधोपचार, बेकार-बेरोजगारांना = रोजगार, पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरुण-तरुणींचे = लग्न, दुःखी व निराशांना = हिंमत हा मानवधर्म पाया आहे.

त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली. महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस। असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे- या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ, असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावतीजवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नाव दिले आहे. गाडगेबांच्या शिकवणीप्रमाणे आजचा खरा रोकडा धर्म आहे! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !! !! थोर समाजसुधारक संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांना जयंती सप्ताह निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

*********

- संकलन व शब्दांकन -

संत चरणधूळ: बापू-श्रीकृष्णदास निरंकारी.
द्वारा- श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ,
रा. रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप-
९४२३७१४८८३.

# ज्ञानियांना विज्ञान शिकवणारा संत

गाडगेबाबा नाव नाही तर विद्यापीठ आहे. या एका मानसाच्या विद्यापिठामध्ये कर्मकांड, अंधविश्वास, व्यसन कोणत्याच गोष्टिला थारा नसुन फक्त विज्ञानवाद व तर्कवादाची शिकवण देणारे संत म्हणजे गाडगेबाबा होत. धर्माच्या व देवाच्या नावावर पोट भरणाऱ्या व्यवस्थेला सुरुंग लावणारे व दगडामध्ये देव नाही हे आपल्या पहाडी आवाजातून किर्तनाच्या माध्यमातून गावोगावी फिरून कुणाचा एकही रूपया न घेता प्रबोधनाचे अविरतपणे काम करणारे गाडगेबाबा विचाराशी व ध्येयाशी एकनिष्ठ होते म्हणूनच या व्यवस्थेने गाडगेबाबा यांना दाबण्याचा प्रयत्न केला. परंतु सुर्य हाताने झाकत नसतो. जो सुर्य हाताना झाकण्याचा प्रयत्न करतो फक्त त्यालाच सुर्य दिसत नाही बाकी कुठेच त्यांचा परिणाम दिसत नाही असेच गाडगेबाबा बद्दल घडले व या बुवा बाजीच्या काळात अनेक बाबा जेल मध्ये असताना सुद्धा आम्हाला गाडगेबाबा वंदनीय आहेत. गाबगेबाबाचे विचार ऐकले तर आज स्वतः ला उच्च शिक्षीत समजणाऱ्या लोकांच्या डोक्यात मुंगा आणणारे आहेत. गाडगेबाबा यांचे विचार एवढे धारदार आहेत कि ते व्यवस्थेची सरळ चिरफाड करून विज्ञान व तर्कवादाची शिकवण देऊन समाजामध्ये समता निर्माण करतात. अशिक्षित गाडगेबाबा यांच्या विचाराची भिती येथील मनुवाद्यांनी घेतलेली आहे की या मानसाचे क विचार कोणत्याच प्रसार माध्यमाच्या माध्यमातून व्यवस्था दाखवु शकत नाही. कारण त्यांना माहिती आहे गाडगेबाबा यांच्या विचारांना आपण थोडी जरी प्रसिद्धी दिली तर पुजाऱ्याचे पाट उपाशी मरणार. म्हणून या पुजाऱ्याच्या व्यवस्थेने गाडगेबाबा ला थोडे दुरच ठेवले आहे.

गाडगेबाबांची कणखर वाणी आणि त्यातही धारधार शब्दांने हजारो वर्षापासून चालत आलेल्या रुढी परंपरा यावर फक्त प्रबोधनच नाही तर स्वतः झुगारून जनजागृती करणारा हा महान संत. आज गाडगे महाराज यांचे विचार सुशिक्षित व्यक्ती वाचु शकत नाही. गाडगे महाराजांचे विचार व्यवस्था चिरणारे असले तरी मानसिक गुलामांना ते जास्त त्रास देतात. मानसिक गुलाम लोकांना गाडगेबाबा धर्माचे विरोधक वाटतात. आजचा शिकलेला वर्ग गाडगेबाबांच्या विचाराने चालायला घाबरतो. त्याची हिम्मतच होत नाही एवढे भेकड व भित्रे लोक या व्यवस्थेने निर्माण केलेले आहेत. विज्ञानाला समोर ठेवून तर्काच्या आधारावर लोकांना सांगून लोकांचे डोके साफ करताना गाडगे बाबा म्हणायचे....

गोपाला गोपाला
देवकी नंदन गोपाला
सांभाळ तुझ्या लेकराला
पुण्य समजती पापाला
हि धोंड्याला म्हणती देवता
भगत धुंडती तया जोगता
स्वतःच देती त्यास योग्यता
देव म्हणून कोणी न भजावे, फुका शेंदरी दगडाला

वरिल विचार लोक ऐकु पण शकत नाहीत परंतु गाडगे महाराज यांनी महाराष्ट्र भर या विषयावर प्रबोधन केले. दगडाला माहिती नसते आपण कोण आहोत आपणच दगडाचे महत्त्व ठरवतो जागृत देवस्थान, नवसाला पावणारे देवस्थान, मुल होणारे देवस्थान, देव व दगडाचा जेव्हा विषय येतो तेव्हा भावनिक होऊन धर्माच्या ढालिचा वापर करतात. कोणता धर्म अज्ञानी राहायचे सागंतो? आणि जो अज्ञानी रखहण्यासाठी सांगतात तेथे अज्ञानी राहणाराचा नाही अज्ञानी ठेवणाऱ्याचा धर्म असतो हि साधी गोष्ट आपल्या लक्षात येत नाही. देवाच्या नावाखाली लोक अकार्यक्षम बनत आहेत. आज गाडगेबाबा जयंती दिनी मी धाडस करुन व्यवस्थेला एक प्रश्न करणार आहे. हजारो वर्षापासून देवाच्या व कर्मकांडाच्या नावाखाली आमचा पैसा लाटला व लाठत आहात. तुम्ही जर देवाचे मध्यस्ती आहात तर मला कोणत्याही जागृत देवाचे ठिकाण सांगा तेथे जाऊन तुमच्या च परंपरेप्रमाणे मी पुर्ण विधी करतो आणी माझ्या साठी नाही देशासाठी मागतो. दहशतवादी हल्ले होतात तर आमच्या सैनिकांना मरू देऊ नको. देशात शेतकऱ्यांना फाशी घेऊ देवु नको आणि बलात्कार करणाऱ्या लोकांना नपुंसकत्व येऊ दे. हे काम देशासाठी करतोय कोणत्याही साधुने मला या साठी मदत करावी. चुकीचे कामं करून गोरगरीब जनतेला लुटून स्वतः च स्वतः ची पाठ थोपटणारे , मी केलेले काम हेच योग्य आहे म्हणून मिरवणारे लोक कमी नाहीत. गाडगेबाबा यांची एक एक ओवी मानसिक गुलामांच्या व धर्माच्या ठेकेदाराच्या काळजात घुसते आणि हे खोटे असेल तर लाख रूपये पगार घेणारा व स्वतः जवळ बंदुक बाळगणाऱ्या लोकांनी बोलुन दाखवावे धोंड्याला म्हणती देवता. दगडाला लोक देव समजतात आणि त्याची पुजा अर्चा करतात. पुजा अर्चा फुकट होत नाही. दान द्यावे लागते दगडाला बोलता येत नाही, स्वतः चे रक्षण करता येत नाही, अंघोळ करता येत नाही, धोतर नेसता येत नाही, स्वतः च्या घरात दिवा लावता येत नाही तो देव लोकांच्या घरात काय दिवा लावणार हे शब्द सगळे अडाणी असलेले परंतु विद्वान असलेल्या गाडगे बाबांचे आहेत. गाडगेबाबा यांचे शब्द कानाला व मनाला झोंबणारे असले तरी परिवर्तन करणारे आहेत मात्र हे शब्द लोकांपर्यंत पोहचुन नाही याची पुर्ण व्यवस्था या व्यवस्थेने केली आहे. गाबगेबाबाचे आपल्या किर्तनातुन सांगतात देव घर देत नाही, देव भाकर देत देव काहीच देत नाही तरी आम्ही देवाची पुजा करून पुजाऱ्याला दान देतो परंतु घर बांधणाऱ्या गवंड्याचा आम्ही सत्कार करत नाहीत. भटजीच्या हाताने सत्यनारायण करतो. हे विचार गाडगे महाराजांचे आज किती लोक स्विकारतात, किती लोक गाडगेबाबा यांनी दिलेल्या मार्गावर चालण्याचे धाडस करतात. गाडगे महाराजाच्या विचारावर चालायला शिक्षण नाही तर मानसिक धाडस महत्त्वाचे आहे. आज किती लोक आहेत की नवीन घर घेतले तर त्या घरात कोणतीच पुजाअर्चा न करता राहायला जाता . किंवा घर बांधणाऱ्या मजुराचा सत्कार करतात. तर एकहि नाही लोक म्हणत असतील आम्ही भटजीला न बोलवाता आम्ही च सगळा कार्यक्रम केली केला तर हे परिवर्तन नाही उलट भटजी उपस्थित नसताना सुद्धा त्याची व्यवस्था टिकण्याचे आपण प्रयत्न करत असतो.



लिंबु मिरची खातात की लटकवतात याची अक्कल नसलेले लोक शिक्षीत आहे असे म्हणताच येणार नाही.

कुणी रहावे खुळे अडाणी
शिक्षण घ्यावे व्हावे ज्ञानी
याच साठी झिजते ही वाणी

गाडगेबाबा स्वतः अडाणी असले तरी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण म्हणजे लिहता वाचता येणे नाही तर खरं आणि खोटं यातील फरक समजून खोट्याला झुगारून खऱ्याचा स्विकार करणे म्हणजे शिक्षण होय. गाडगेबाबा यांच्या नजरेतून पाहिले तर एकही माणुस अजूनही शिक्षीत झाला नाही. खरं आणि खोटे यातील फरक अजुनही कळालेला नाही म्हणून च बहुजन समाजाच्या बाया भोगून जेल मध्ये गेलेल्या आसारामचे फोटो आजही लोकांच्या घरात आहेत परंतु आसाराम सारखे लोक तयारच होऊ नये याची व्यवस्था निर्माण करणारे गाडगेबाबांचे फोटो घरात लावणे आजही या शिकलेल्या लोकांना जमले नाही. दारू पिऊन कुटुबांची राखरांगोळी करू नका असा संदेश देऊनही आज जेवढा जास्त पगार तेवढा महागडा ब्रँड लोक पितात व सगळी कमाई त्यात घालतात.

जे लोक कोणतेच काम करत नाही ते लोक तुपाचा शिरा खातात आणि आम्ही काम करू करू आमच्या पिढ्या बरबाद झाल्या तरी आज तुप मिळत नाही हि व्यवस्था निर्माण झाली आहे म्हणून आपण खरं काय समजून घेतलं पाहिजे. म्हैस विकत घेऊन, तिला चारायला नेने आणने, तीची साफसफाई करून दुध काढणारे हे बहुजन आहेत दुग्धजन्य पदार्थ खाणारे मात्र लोक वेगळे आहेत म्हणून जागृती करून आपला शत्रु कोण याची ओळख होणे महत्त्वाचे आहे. पण आज आम्हाला शत्रु आणि मीत्र याची ओळख नाही. गाडगे बाबा यांनी समस्त आयुष्य हे समाजाच्या परिवर्तनासाठी खर्ची गातले परंतु आजही समाजात परिवर्तन झाले नाही ही मोठी खेदाची गोष्ट आहे. परिवर्तन होते जर आपण गाडगेबाबा यांचे विचार वाचले व स्विकारले तर पण गाडगेबाबांचे विचार वाचायला खुप मोठे काळीज पाहिजे. आणि माणसिक गुलाम लोकांकडे काळीज नसते म्हणून आज ते देवाची पुजा भक्तीने तर भितीने करत आहेत जर मी असं केले नाही तर कोप होईल प्रकोप होईल वैगेरे वैगेरे.

अंधविश्वास, कर्मकांड, सत्यनारायण यामाध्यातुन आपण आपले नाही तर पुजाऱ्याचे भले करत असतो. देव देवळात नाही देवळात पुजाऱ्याचे पोट असते कसे गाडगेबाबा सांगुन गेले तरी आज पर्यंत ना विचार आचार ना तर्क केला. परंतु हे सगळं अगोदरच गाडगेबाबा यांनी आपल्या आयुष्य भर सांगतच गेले. आज गाडगेबाबा जयंती दिनी विज्ञानवादी बनण्याचा प्रयत्न करू या.

************

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# प्राचीन व मध्ययुगीन इतिहास

मागील लेखामध्ये इतिहास या घटकावर मागील काही वर्षांत विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे विश्लेषण आपण पाहिले. या आणि पुढील लेखामध्ये या घटकाची तयारी कशी करावी ते पाहू. या घटक विषयाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे: भारताचा इतिहास (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) व राष्ट्रीय चळवळ'

अभ्यासक्रमामध्ये प्राचीन व मध्ययुगीन कालखंडाचा उल्लेख नाही. पण भारताचा इतिहास व राष्ट्रीय चळवळ असा उल्लेख असल्यामुळे या दोन कालखंडांचा अभ्यासही आयोगाला अभिप्रेत आहे ते लक्षात घ्यावे लागेल. शिवाय प्रश्न पत्रिकांच्या विश्लेषणावरूनही ही बाब स्पष्ट होते. प्राचीन अणि मध्ययुगीन इतिहासाचा कालखंड हा खूपच विस्तृत आहे. त्यात महाराष्ट्राचा विशेष संदर्भ असल्याने या कालखंडातील महाराष्ट्राचा अभ्यास अजूनच खोलवर करावा लागतो.

आधुनिक भारतीय इतिहासातील मुद्दे, घटना यांची तोंड ओळख असल्याने याविषयी उमेदवारांना सर्वसाधारण माहिती असते. पण तुलनेने प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास घटकाच्या अभ्यासाविषयी क्लिअर प्लॅन नसतो. त्यामुळे बरेच वेळा हा घटक पाहिल्यावर नवीन उमेदवारांना स्पर्धा परीक्षा खूप विस्तारलेली किंवा खूप अवघड आहे असे वाटू लागते. तुलनेने अवघड वाटणाऱ्या या घटक विषयाचा अभ्यास सोप्या पद्धतीने कसा करता येईल ते या लेखात पाहू.

प्राचीन कालखंड

महाराष्ट्रातील प्रागैतिहासिक पुरातत्व स्थळे, त्यांचा काळ, उत्खननातील वस्तू आणि त्या त्या कालखंडाबाबत इतिहासकारांची मते माहीत असायला हवीत. त्याबरोबरच भारतामध्ये अन्य ठिकाणच्या प्रागैतिहासिक पुरातत्व स्थळांचा आढावा घ्यायला हवा. सिंधु संस्कृतीमधील पुरातत्व स्थळे, तेथील उत्खननात सापडलेल्या वस्तू, त्यांची वैशिष्ट्ये, उत्खननकर्ते, नगर रचनेची ठळक वैशिष्ट्ये, कालखंड व अस्ताबाबतची इतिहासकारांची मते या बाबी माहित असायला हव्यात.

वैदिक व उत्तरवैदिक कालखंडातील ग्रंथ व त्यांचे विषय व त्यांतील महत्त्वाचे मुद्दे, साहित्य, साहित्यकार यांवर अभ्यास करताना भर द्यायला हवा. या काळातील आर्थिक व्यवहार, सामाजिक रचना, सांस्कृतिक बाबी आणि राजकीय जीवन यांचा आढावा घ्यायला हवा.



जैन व बौद्ध धर्मांचा उदय व विस्तार, त्यांची मुख्य शिकवण, महत्त्वाचे ग्रंथ, राजाश्रय यांचा अभ्यास आवश्यक आहे. या काळातील सोळा महाजनपदे आणि त्यांचे महत्त्वाचे शासक यांचा आढावा घ्यायला हवा.

तमिळ संगम साहित्य, त्यांचे साहित्यकार आणि ग्रंथ, महत्त्वाच्या ग्रंथांमध्ये वर्णन केलेले विषय, कालखंड, राजवटी / राजाश्रय यांच्या नोट्स काढून अभ्यास करायला हवा. या काळातील महत्त्वाच्या राजवटी आणि त्यांमधील संघर्षाचाही आढावा घ्यायला हवा.

मौर्य व गुप्त साम्राज्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाचे स्त्रोत, शिलालेख, नाणी, साहीत्य यांच्या टेबलमध्ये नोटस काढाव्या. या कालखंडातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाचे स्वरूप समजून घ्यावे. विशेषत: अशोकाच्या कालखंडातील प्रशासन व बौद्ध धर्मविषयक बाबी बारकाईने अभ्यासाव्यात. गुप्त कालखंडातील कला, नाणी व राजकीय घडामोडींवर जास्त भर द्यावा.

प्राचीन महाराष्ट्रातील सातवाहन घराणे, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट घराणे, शिलाहार, गोंड घराणे या घराण्यांचा अभ्यास करताना घराणे/ राजवटीचा कालखंड, संस्थापक, महत्त्वाचे राजे, शाखा व त्याचे प्रमुख, राजधानी (आर्थिक/सांस्कृतिक), आर्थिक, सामाजिक स्थिती, सांस्कृतिक योगदान, महत्त्वाच्या घटना, प्रमुख युद्धे या बाबींचा तुलनात्मक अभ्यास करणे फायद्याचे ठरते.

मध्ययुगीन कालखंड

मध्ययुगीन कालखंडामध्ये राजकीय आणि सामाजिक–सांस्कृतिक अभ्यासावर भर असावा. हर्षाच्या अस्तानंतर सल्तनत कालखंडापर्यंतचे प्रादेशिक राज्ये, त्यांचे महत्त्वपूर्ण राजे, लढाया, त्यांचे परिणाम, समकालीन जगभरातील घटना आणि त्यांचा भारतावरील परिणाम हे मुद्दे असणारे टेबल तयार करावेत. सल्तनत व मुघल काळातील महत्त्वाचे राज्यकर्ते, त्यांचे महत्त्वाचे आर्थिक – सामाजिक निर्णय, महत्त्वाच्या लढाया व त्यांचे निर्णय यांचा टेबलमध्ये अभ्यास करावा.

मध्ययुगीन महाराष्ट्रातील प्रमुख राजवटींचा अभ्यास – चालुक्य, यादव, बहामनी – (ईमादशाही, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही, बरीदशाही) महत्त्वाचे राज्यकर्ते, त्यांचे महत्त्वाचे निर्णय, महत्त्वाच्या लढाया व त्यांचे निर्णय या मुद्द्यांच्या आधारे करावा.

मध्ययुगीन कालखंड हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध होता. या कालखंडातील सांस्कृतिक जीवन अभ्यासण्यासाठी इग्नूच्या नोट्स हा उत्तम संदर्भ ठरतो. या काळातील विविध कला व शास्त्रीय शोधांचा आढावा घ्यायला हवा. वास्तुकला, चित्रकला व संगीत आणि नृत्य या दृष्यकलांचा वेगवेगळ्या शैली, आणि त्यांची वैशिष्ट्ये व त्यांचे क्षेत्र या मुद्द्यांच्या आधारे नोट्स काढून अभ्यास करावा. भारतातील वेगवेगळ्या राज्यांच्या आश्रयाला असलेले साहित्यिक, इतिहासकार आणि त्यांच्या रचना व त्यातील महत्त्वाच्या साहित्यकृतींचा विषय, या कालखंडातील परकीय प्रवासी आणि त्यांची प्रवासवर्णने यांचा टेबलमध्ये नोट्स काढून अभ्यास करावा. प्रश्नांचे वस्तुनिष्ठ स्वरूप लक्षात घेता नोट्स काढणे आणि त्यांची उजळणी करणे या घटकाच्या परिणामकारक तयारीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

मराठा कालखंड (१६३०१८१८)

मराठा राजवटीचा कालखंड छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेपासून १८१८ पर्यंत असा आहे. शिवाजी महाराजांच्या महत्त्वाच्या लढाया, तह, ठळक घडामोडी, अष्टप्रधान मंडळ, आर्थिक व राजकीय निर्णय यांचा बारकाईने अभ्यास करावा. पेशव्यांची कारकीर्द अभ्यासताना महत्त्वाचे पेशवे, त्यांच्या लढाया व त्यांचे निर्णय, तह, महत्त्वाचे मराठा सरदार व त्यांचे कार्यक्षेत्र हे मुद्दे लक्षात घ्यावेत. वारकरी संप्रदाय, महानुभाव पंथ, इतर मध्ययुगीन संत, त्यांच्या रचना, त्यांची शिकवण यांचा आढावा घ्यायला हवा. वारकरी संप्रदाय तसेच महाराष्ट्रातील इतर संतांच्या व्यक्तिगत आयुष्यातील बाबीही माहीत असणे आवश्यक आहे.

# तुम्ही ताडगोळा खाल्लाय का कधी?


अनेक ठिकाणी ताडगोळ्यातलं पाणी नीरा म्हणून वापरले जाते. आणि सकाळी उठल्यावर हे पाणी प्यायल्यास अंगयष्टी काटक राहते. उन्हाळा सुरू झाला की मुंबईत जागोजागी ताडगोळे दिसू लागतात. तुम्ही ताडगोळे कधी खाल्ले आहेत का?'आई , व्हॉट्स दॅट? जे ॲक्च्युअली दिसतं नारळासारखं पण खूप डेलिकेट वाटतं. म्हणजे लिची प्लस फ्रेश कोकोनट. सिया आईला विचारात होती. 'लिची प्लस कोकोनट? तू खाऊन पाहिलास का? कुठे खाल्लंस'? श्वेता विचारात पडली.'नाही मी येताना पाहिलं एका गाडीवर. म्हणजे बर्फासारख दिसतं. पर्ल व्हाईट कलर – हार्ट शेप्ड. ते खातात का'? सिया शक्य तितकं वर्णन करायचा प्रयत्न करत होती. त्यावर मी आणि श्वेता आम्ही दोघीजणी एकासुरात 'ताडगोळा' असं म्हणालो.मी पटकन तिला आईस ॲपल म्हणजेच ताडगोळ्याचा फोटो दाखवला आणि सिया हो हो सेम असं आनंदाने ओरडलीच. पुण्यात राहत असल्यामुळे तिने मुंबईत आल्यावर पहिल्यांदाच हे फळ पाहिलं होतं आणि हे नक्की काय असावं असा विचार तिला पडला होता. उन्हाळ्याची चाहूल लागली कि मुंबईत रस्त्यारस्त्यावर सहज दिसणारं फळ म्हणजे ताडगोळा.वरून टणक तांबडं किंवा हिरवं कवच आणि आत धुकेरी पांढऱ्या रंगाचा लुसलुशीत ताडगोळा. त्याच्याही आत थोडंसं गोड किंवा तुरट पाणी जे नारळपाणीच असतं. पण अगदीच चवीपुरतं!उन्हाळ्यात थकवा येत असेल किंवा चालून झाल्यावर कमी कॅलरीज आणि उत्तम ऊर्जा हवी असेल तर २ ताडगोळे खाऊन तुम्ही आणखी ३ किलोमीटर अंतर उत्तम चालू शकता.ताडगोळा खरं तर जीवनसत्व आणि खनिजांनी युक्त असं फळ आहे. ताडगोळ्याला इंग्रजीमध्ये आईस पल असे म्हणले जाते. किमान २ ताडगोळ्यांमध्ये १०० कॅलरीज इतकी ऊर्जा असते आणि मुख्यत्वे ही ऊर्जा त्यात असणाऱ्या कर्बोदकांमुळे आहे. यात असणाऱ्या २५ ग्राम कर्बोदकांसोबत ३ ग्राम तंतुमय पदार्थ देखील असतात.ताडगोळा खाल्ल्याने होणारे फायदे –१. थकवा आल्यास शरीराला पटकन ऊर्जा पुरवतं २. रक्तदाब कमी करतं ३. रोगप्रतिकारशक्ती वाढवतं ४. गरोदर स्त्रियांमध्ये अपचन कमी करतं ५, मलावरोध कमी करतं ६. आतड्याचे विकार कमी होतात



७. पोटाचे विकार कमी करतं ८. स्तनाच्या कर्करोगापासून रक्षण करतं ९. मुरुमे कमी करतं १०. त्वचेची आर्द्रता सुधारतंज्यांना दमा किंवा सर्दी खोकला आहे त्यांनी मात्र ताडगोळे खाणे टाळावे. शिवाय ताडगोळा खाल्ल्यानंतर त्यावर पाणी पिणे टाळावे. विशेषतः गरोदर स्त्रियांमध्ये ताडगोळा खाल्ल्यामुळे जळजळ होणे, ॲसिडिटी होणे यासारखे विकार कमी होऊ शकतात. कुटुंबामध्ये हृदयविकार असणाऱ्यांनी ताडगोळा आवर्जून आहारात समाविष्ट करावा. हृदयाच्या आरोग्यासाठी ताडगोळा गुणकारी फळ आहे. ज्यांना उन्हामुळे त्रास होतो किंवा उष्माघाताचा त्रास होतो त्यांनी नियमितपणे ताडगोळा खावा.अनेक ठिकाणी ताडगोळ्यातलं पाणी नीरा म्हणून वापरले जाते. आणि सकाळी उठल्यावर हे पाणी प्यायल्यास अंगयष्टी काटक राहते. ग्लायसेमिक लोड कमी असणारा ताडगोळा मधुमेह असणाऱ्यांसाठी देखील उपयुक्त आहे.अनेक ठिकाणी ताडगोळ्याचे आईस्क्रीम तयार केले जाते. ताडगोळ्यांसोबत बर्फ किंवा दूध एकत्र केल्यास हे मिश्रण विषारी मानले जाते. त्यामुळे ताडगोळा नुसता खाणे कधीही उत्तम. त्याचा मिल्कशेक किंवा तत्सम पदार्थ करुन खाऊ नये. वेगळी चव आणि केवळ उन्हाळ्यात उपलब्ध असणारा ताडगोळा शरीरासाठी उत्तम फळ आहे. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनी ताडगोळा खावा.

# मुंबई महापालिकेच्या शीव रुग्णालयात सत्तरीच्या आजीवर दुर्धर शस्त्रक्रिया!

मुंबई : कर्नाटकमधील गुलबर्गा येथे राहाणाऱ्या सत्तरीच्या रेणुका आजी एका लग्नासाठी वडाळा येथे नातेवाईकांकडे आल्या होत्या. दुपारच्या सुमारास अचानक तोंडाची उजवी बाजू वाकडी होऊ लागली. डावा हात व पाय बधीर होऊ लागला. बोलणे कठीण होत गेले. आजीची ही परिस्थिती पाहून नातावाईकांनी तात्काळ महापालिकेचे शीव रुग्णालय गाठले. तेथे मेडिसीन विभागातील तपासणीमध्ये अर्धांगवायू झाल्याचे निदान झाले. मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत गुठळ्या झाल्या होत्या. अशा रुग्णांना पहिल्या सहा तासात उपचार मिळाल्यास ते पूर्णता बरे होऊ शकतात. शीवमधील इंट्राव्हेन्शनल रेडिओलॉजी विभागात अत्याधुनिक उपचार यंत्रणा होती. डॉक्टरांनी तात्काळ उपचार करून मेंदुतील रक्ताची गुठळी काढण्याची शस्त्रक्रिया केली. आज्ञीबाईची प्रकृती आज उत्तम आहे.



सत्तरीच्या रेणुका आजींना शीव रुग्णालयातील मेडिसीन विभागात आणल्यानंतर विभागप्रमुख डॉ. नितीन कर्णिक यांनी तात्काळ सिटी स्कॅनसह सर्व आवश्यक चाचण्या केल्या. यातून अर्धांगवायुचे निदान झाले. आजीबाईच्या मेंदुला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये गुठळी झाल्याने मेंदूला रक्तपुरवठा कमी होत होता. तो बंद होण्याच्या मार्गावर होता. अशा रुग्णांना पहिल्या सहा तासांत उपचार मिळाल्यास रुग्ण पूर्णता बरा होऊ शकतो. यासाठी 'मॅकॅनिकल थ्रोंबेक्टॉमी' प्रक्रिया करण्याची गरज होती. यात मांडीमधून एका सुईच्या छिद्राएवढा छेद घेऊन मेंदुमधील रक्तवाहिनीतील गुठळी काढण्यात येते. शीव रुग्णालयातील इंट्राव्हेन्शनल रेडिओलॉजी विभागात २०१६ पासून हा इलाज केला जातो. वर्षाकाठी दोन हजारांहून अधिक अशा प्रकारच्या रक्तवाहिनीमधील गुठळ्यांवरील शस्त्रक्रिया येथे केल्या जातात. मेंदूच्या रक्तवाहिन्यांमधील उपचाराव्यतिरिक्त विभागात डायबिटीक फुटसाठी पायाच्या गँगरीनमध्ये केली जाणारी पायाची अँजिओप्लास्टी, यकृताचे आजार, रक्तस्त्रावावरील उपचार अशा रक्तवाहिन्यांशी संबंधित अनेक आजारांवर उपचार केले जातात.रेणुका आजींवर त्या दिवशी उपचार करण्यात मेडिसीन विभाग, हृदयविकार विभाग, भूल विभाग, तसेच इंट्राव्हेन्श्नल रेडिओलॉजी विभागाने कमालीच्या वेगाने व पूर्ण समन्वय साधून उपचार केल्यामुळेच आज त्यांची प्रकृती शंभर टक्के उत्तम झाल्याचे इंट्राव्हेन्शनल रेडिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. विवेक उकिर्डे यांनी सांगितले. आजी परत चालत आपल्या घरी गेल्याचे रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ मोहन जोशी यांनी सांगितले. आजींवरील उपचारात सहयोगी प्राध्यपाक डॉ. कुणाल अरोरा, डॉ. अक्षय मोरे, डॉ. कुशल बिडचंदानी, तसेच मेडिसीन विभागप्रमुख डॉ. नितीन कर्णिक यांची मोलाची भूमिका असल्याचेही डॉ. मोहन जोशी म्हणाले. खाजगी रुग्णालयात याच शस्त्रक्रियेसाठी सुमारे ११ लाख रुपये खर्च येतो मात्र सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे शीव रुग्णालयात आजींना एक रुपयाही खर्च करावा लागला नाही.

# पॉर्नबद्दल मुलांशी कसं बोलाल? आणि काय बोलाल?

डिजिटल जगावरचं अवलंबत्व हे बऱ्याचदा प्रत्यक्ष जगातल्या अपेक्षाभंगातून आलेलं असू शकतं. मुलांच्या बाबत समवयीन मुलांनी सामावून घेणं, आपण ट्रेंडी आहोत हे सिद्ध करणं ही कारणं असतातच पण त्याचबरोबर प्रत्यक्ष जगात काहीतरी खटकत असतं जे दुरुस्त करण्याची सोय त्यांच्याकडे नसते. अशावेळी येणारा ताण हाताळण्यासाठीही मुलं ऑनलाईन जगावर अवलंबून राहायला सुरुवात करतात. आईबाबांची भांडणं, शाळा कॉलेजमधलं बुलिंग, भविष्याचा ताण, आजूबाजूच्या वातावरणाचा ताण असे अनेक मुद्दे असतात ज्यातून बाहेर पडण्याचा कुठलाही रस्ता मुलांकडे नसतो. त्या अर्थाने मुलं पालकांवर आणि कुटुंब व्यवस्थेवर पूर्णपणे अवलंबून असतात आणि दरवेळी पालक आणि कुटुंब व्यवस्था त्यांच्या स्वास्थ्यासाठी काम करत असतेच असं नाही.

अशावेळी प्रत्यक्ष जगातला ताण, प्रश्न, समस्या विसरण्यासाठी मुलं ऑनलाईन जगात वावरायला, रमायला सुरुवात करतात. ते जग त्यांना अधिक चांगलं वाटायला लागतं. पॉर्न आणि गेमिंगच्या बाबतीतही कमी अधिक प्रमाणात हेच घडतं. स्वतःच्या देहाविषयी, लैंगिक अवयवांविषयी या वयात अनेक प्रश्न असतात, संकोच असतो. अशावेळी ऑनलाईन जगात जे दिसतंय त्यानं सुखावल्याचा आभास होतो. आपण तसे होऊ शकत नाही तर निदान बघून समाधान मिळवूया ही भावना तीव्र असते. पॉर्न बघणाऱ्या बहुतेकांमध्ये ही भावना तीव्र असू शकते. त्यातून पॉर्न बघण्याचं प्रमाण वाढतं, टॉलरन्स' वाढतो. अशावेळी पालक/शिक्षकांनी काय केलं पाहिजे?



१) पॉर्न बघण्याचं आणि गेमिंग करण्याचं प्रमाण जास्त आहे असं लक्षात आलं तर त्याचं मूळ प्रत्यक्ष जगातल्या प्रश्नात आहे का हे शोधलं पाहिजे. घरात, शाळेत, कॉलेजमध्ये काहीतरी चुकीचं घडतंय का, असं काहीतरी जे त्या मुलाला आवडत नाहीये, पटत नाहीये पण त्यातून स्वतःची सुटकाही करुन घेता येत नाहीये. हा शोध अतिशय गरजेचा आहे. अनेकदा मुलं नैराश्यात असतात. मुलांचं नैराश्य पालक/शिक्षकांना चटकन लक्षात येत नाही किंवा अनेकदा मुलांमध्ये नैराश्य असू शकतं हा विचारच पालक/शिक्षकांना पटत नाही आणि दुर्लक्ष होतं. तसं होऊ देऊ नका. आरडाओरडा करण्याआधी मूल असं का वागतेय याचा शोध आवश्यक आहे.

२) मुलांचा सोशल मीडिया वापर तपासा. अनेकदा सोशल मीडिया शरीर प्रतिमेचे प्रश्न तयार करतं. इन्स्टा आणि इतर काही सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर मोठ्या प्रमाणावर बॉडी शेमिंग चालतं. त्यातून स्वतःविषयी प्रश्न, शंका उपस्थित राहू शकतात. त्याचबरोबर स्वतःच्या लैंगिकतेला धरुन, देहाच्या आकाराला धरुन प्रश्न निर्माण होऊ शकतात ज्यांची उत्तरं शोधायला मुलं पॉर्न साइट्सकडे वाळलेली असू शकतात. त्यामुळे मुलांशी सोशल मीडियाबद्दल बोललं गेलं पाहिजे. तिथे काही गडबड नाहीये ना हे तपासून बघितलं पाहिजे.

३) काही मुलामुलांच्या लैंगिक जाणिवा खूप लवकर जाग्या होतात. पण जाग्या झालेल्या या जाणिवांचं करायचं काय हे त्यांना लक्षात येत नाही. लैंगिकतेबद्दलचा संवाद नसल्याने आपल्याला जे काही वाटतंय ते काय आहे हे शोधायला मुलं ऑनलाईन जगात आणि पॉर्नवर जातात आणि रमायला लागतात. त्यामुळे मुलांशी लैंगिकतेबद्दल बोलणं, हस्तमैथुनाबद्दल बोलणं आवश्यक आहे. पॉर्न बघून तिथले प्रकार प्रत्यक्ष मुलांनी करून बघू नयेत, स्वतःला आणि इतर मुलांना धोक्यात आणू नये असं वाटत असेल तर सेक्सबद्दल बोलायला आजच्या काळात तरी पर्याय नाही.

४) पॉर्न बघितलं म्हणून मुलांना मारझोड करु नका. रागावू नका. टाकून बोलू नका. ते अपराधी आहेत, गुन्हेगार आहेत अशी वागणूक देऊ नका. त्यांना गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभं करुन त्यांची उलट तपासणी घेऊ नका. मुलांनाही आत्मसन्मान असतो. या सगळ्या गोष्टी केल्याने आपल्या मुलांचे वर्तन सुधारेल अशी ज्यांना खात्री असते ते अत्यंत चुकीच्या पद्धतीने मुलांच्या प्रश्नांकडे बघत असतात. मोठ्या अधिकारपदावर असतात म्हणून मुलं काहीही करु शकत नाहीत, बोलू शकत नाहीत हे पालक आणि शिक्षकांनी कायम लक्षात ठेवलं पाहिजे. मुलांच्या मनात भावनांचा उद्रेक होण्यापेक्षा त्यांच्या मनातल्या भावनांना वाट करुन देण्याची अधिक गरज असते.

५) पॉर्न बघणाऱ्या मुलांशी बोलताना अवघडलेपण नको. मुलं आधीच अवघडलेली असतात. त्यांना हा संवाद नको असतो. त्यात मोठेही अवघडलेले असतील तर संवादाच्या शक्यता कमी होतात. जे काही बोलायचं आहे ते उपदेश ना करता संवाद साधण्याच्या भूमिकेतून असेल तर मुलांपर्यंत ते पोहोचतं. अन्यथा सगळे शब्द नुसते हवेत विरुन जातात हे कायम लक्षात ठेवलं पाहिजे.

# नंदीग्रामचा विस्तार; आदिलाबाद नव्हे, बल्लारशाह येथून धावणार



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) आदिलाबाद– मुंबई अशी धावणाऱ्या नंदीग्राम एक्स्प्रेसचा विस्तार करण्यात आला असून, ही रेल्वे आता चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशाह येथून मुंबई अशी धावणार आहे. तसे या गाडीचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. मात्र, या गाडीचा मुहूर्त केव्हा हे अद्याप जाहीर झाले नाही. कोरोना काळात रेल्वे गाड्या बंद केल्या होत्या. हा संसर्ग कमी झाल्यानंतर नंदीग्राम एक्स्प्रेस विशेष गाडीच्या रूपाने सुरुवातीला नांदेड ते मुंबई अशी धावू लागली. त्यानंतर या गाडीचा विस्तार आदिलाबादपर्यंत करावा, अशी मागणी झाली. तेव्हा ही गाडी किनवट येथून मुंबईसाठी धावू लागली. त्यानंतर काही दिवसांनी आदिलाबादपर्यंत विस्तार करण्यात आला. आजही ही गाडी आदिलाबाद येथूनच धावते. ती आदिलाबादच्या पुढे सरकली नाही. नंदीग्राम एक्स्प्रेस गाडीचा विस्तार नागपूरपर्यंत करावा, ही मागणी आदिलाबादचे खासदार सोयाम बापूराव यांनी २०२१ पासून नागरपूरला अपयश, चंद्रपूरला यश एकेकाळी नागपूर–मुंबई नंदीग्राम एक्स्प्रेस ही गाडी नावाजलेली होती. कालांतराने ही गाडी आदिलाबाद– मुंबई चालविली जात आहे. आदिलाबादपासून पुढे नागपूरपर्यंत नंदीग्रामचा विस्तार करावा, अशी मागणी आदिलाबादचे खासदार सोयाम बापूराव यांनी अनेक वर्षांपासून लावून धरली होती. खासदारांच्या या मागणीला काही यश आले नाही. मात्र, माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या पाठपुराव्याने आता ही गाडी चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशाहपर्यंत धावणार आहे. रेल्वे बोर्डाचे संयुक्त निदेशक (कोचिंग) विवेककुमार सिन्हा यांनी काढलेल्या पत्रकावरून हे स्पष्ट होत आहे. नागपूरला अपयश आणि चंद्रपूरला यश, असेच म्हणावे लागेल १६६०० त्यामुळे लावून धरली होती; पण त्यांना नागपूरपर्यंत विस्तार करण्यात यश आले नाही. मात्र, माजी केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी आदिलाबाद येथे थांबणाऱ्या नंदीग्राम एक्स्प्रेसचा विस्तार बल्लारशाहपर्यंत करण्याची मागणी पदरात पाडून घेतली आहे. १६ फेब्रुवारी रोजी भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालय रेल्वे बोर्डाचे संयुक्त निदेशक विवेककुमार सिन्हा यांनी या गाडीचे वेळापत्रक दर्शविणारे पत्रक काढले आहे. बल्लारशाह ते मुंबई अशी मंजुरी मिळाली आहे. मात्र, गाडी धावण्याची तारीख अद्यापही निश्चित करण्यात आली नसल्याने मुहूर्त केव्हा? हे अजून स्पष्ट केले नाही. या विस्तारामुळे चंद्रपूर येथील देवीच्या दर्शनासाठी मराठवाड्यातून जाणाऱ्या भाविकांसाठी सुविधा होणार आहे. शिवाय चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ जिल्ह्यातील प्रवाशांसाठी ही गाडी सोयीची होईल, असे बोलले जात आहे.

# नव्या की जुन्याच रचनेनुसार ! संभ्रम कायम ?



किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत) मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या हालचाली मागील काही महिन्यांपासून थंडावल्या होत्या. मात्र, नुकत्याच साहित्य खरेदीच्या निविदा राज्य शासनाच्या संकेत स्थळावर मागविण्यात आल्याने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे बिगुल कोणत्याही क्षणी वाजू शकेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, आगामी निवडणुका नव्या गट व गण रचनेनुसार की जुन्याच २०१७ प्रमाणे याबाबत संभ्रम कायम आहे. मागील वर्षी मे–जून महिन्यापासून मिनी मंत्रालयाच्या निवडणुकीच्या हालचालींना मोठी गती मिळाली होती, त्यानुसार २८ जुलै २०२२ रोजी जिल्हा त्या नव्या गट व गण रचनेनुसार होणार की जुन्याच गट रचनेनुसार होणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. तूर्तास मात्र निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्या सर्वांमध्ये संभ्रम कायम आहे, किनवट तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती बरोबरच नगरपालिका तसेच नऊ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकाही होण्याची शक्यता आहे. परिषद व पंचायत समितीच्या गट व गणांचे आरक्षण सोडत जिल्हा परिषद गटाची जिल्हा परिषद कार्यालयात तर पंचायत समिती गणाची पंचायत समितीच्या कार्यालयात पार पडली, आरक्षण सोडतीत अनेक दिग्गजांना धक्का बसला. जे इच्छुक निवडणूक लढवण्यासाठी कंबर कसून कामाला किनवट उन्हाळ्यात निवडणुकांची धामधुम तालुका वातपित्र लागले होते, आरक्षण सोडतीनंतर त्यांच्या आशेवर पाणी फेरले. त्यांचा हिरमोड झाला होता. त्यांच्यावर तुम्ही लढा आम्ही तुमच्यासोबत आहोत, अशी वेळ आली होती. त्यानंतर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे वारे जोराने वाहू लागले. तोच महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन पृष्ठ क्रमांक ६ फेब्रुवारी १९, २०२३ द्वारा समर्थित झाले, महाविकास आघाडी सरकार कोसळले अन् शिंदे–फडणवीस सरकार सत्तेवर आले. या सरकारने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जुन्याच पद्धतीने म्हणजे २०१७ प्रमाणे घेण्याचे ठरवत नव्या गट व गण रचनेला स्थगिती दिली. त्यानंतर हिरमोड झालेल्यांना या स्थगितीमुळे दिलासा मिळाला तर नव्या इच्छुकांचा अपेक्षा भंग झाला. कारण नव्या गट व गण रचना इच्छुकांसाठी सोयीच्या होत्या. मात्र, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जुन्याच पद्धतीने होतील, असे घोषित केल्याने त्यांच्याही तोंडचे पाणी पळाले होते. आता आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे बिगुल कोणत्याही क्षणी वाजणार असल्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

**मिनी मंत्रालयाच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार?**

# महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण चोरणाऱ्या अट्टल आरोपीला स्थानिक गुन्हे शाखे कडून अटक.

## २८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व वाहनासह १९ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.




लातूर :– मंगळसूत्र, गंठण, चोरणाऱ्या गुन्ह्यातील आरोपीला अटक. सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल, कार असा एकूण १९ लाख ९४ हजार रुपयांचा २८० ग्रॅम वजनाचा मुद्देमाल जप्त. १६ गुन्हे उघड. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी लातूर जिल्हामध्ये घडणाऱ्या चोरी व चैन स्नॅचिंग चे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अधिकारी/अमलदारांचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामार्फत जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते. आरोपीचा शोध घेण्यासाठी सदर पथक रात्र– दिवस परिश्रम घेत होते. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती. दरम्यान २१/०२/२०२४ विशेष पोलीस पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून चोरलेले सोन्याचे दागिने विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला गूळमार्केट परिसरातून ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव १) सौदागर उर्फ विशाल मोहन रसाळ,वय ३२ वर्ष, रा. महादेवनगर, खंडापुर सद्या राहणार भामरीचौक,लातूर. असे असल्याचे सांगितले. नमूद आरोपीला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, तो मागील काही वर्षापासून लातूर शहरातील रियाझ कॉलनी, पद्मा नगर, शारदा नगर, विशाल नगर, भाग्य नगर, अवंती नगर इतर विविध ठिकाणाहून रस्त्या वरून एकटी/ पायी जाणारे महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण हिसका मारून,चोरून मोटार सायकल वरून निघून जाण्याचे गुन्हे केल्याचे कबूल केले. त्यावरून लातूर जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांचे अभिलेखाची माहिती घेतली असता पोलीस ठाणे शिवाजी नगर, व पोलीस ठाणे एमआयडीसी येथील मंगळसूत्र चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले आहेत. नमूद आरोपीने वर नमूद गुन्हा पैकी १६ गुन्ह्यातील चोरलेला सोन्याचे २८० ग्रॅम वजनाचे १६ मंगळसूत्रे, गंठण व विविध दागिने काढून दिल्याने ते जप्त करण्यात आले आहे. इतर गुन्ह्यातील दागिने विकून खरेदी केलेली एक कार व मोटार सायकल असा एकूण १९,९४,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले,यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक, वेंकटेश पल्लेवाड, प्रवीण राठोड, सपोउपनी बेल्लाळे, पोलीस अमलदार युवराज गिरी, अर्जुन राजपूत, मुन्ना मदने, खुर्रम काझी, रवि गोंदकर , दीनानाथ देवकते, यशपाल कांबळे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, प्रदीप स्वामी, सायबर सेल चे संतोष देवडे, गणेश साठे यांनी केली आहे.

# तटकरे, बनसोडे यांना दाखवले काळे झेंडे



लातूर : प्रतिनिधी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे दि. २२ फेब्रुवारी रोजी राजकयी कार्यक्रमानिमित्ताने लातूर येथे आले होते. कार्यक्रमस्थळी जाण्याअगोदर मराठा कार्यकर्त्यांनी दुपारी त्यांना काळे झेंडे दाखवून निदर्शने केली. यावेळी त्यांच्या समवेत राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर याही होत्या. राष्ट्रवादी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (अजित पवार गट) वतीने गुरुवारी लातूर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. लातूरच्या अंबाजोगाई रोडवरील हॉटेल अतिथी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, रुपाली चाकणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी तटकरे, बनसोडे, चाकणकर यांच्या गाड्यांचा ताफा हॉटेल अतिथीकडे जात असताना अचानक मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी गाड्यांसमोर येत त्यांना काळे झेंडे दाखवले. त्यांच्या निषेधाच्या घोषणाही दिल्या. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी आठ आंदोलक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले. दरम्यान तटकरे, बनसोडे आदींच्या विविध कार्यक्रमांच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला होता.

# बोधडी व सावरी भागातील शेतीसाठी सिंगल फेस लाईट उपलब्ध करून द्या: सभापती गजानन मुंडे यांचे विद्युत कार्यालयाला निवेदन



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) बोधडी बु विद्युत परिमंडळ अंतर्गत बोधडी व सावरी भागातील शेतीसाठी सिंगल फेस लाईट उपलबध नसल्याने शेतकऱ्यांना अंधारात शेतीपिकासाठी जागल करावी लागत आहे.रात्रीच्या वेळी वाघ अस्वल, सायाळ सारखे प्राणी संचार करत असल्याने शेतकऱ्यांना धोका निर्माण झाला असून पिकांच्या संरक्षण करणे सोयीचे व्हावे व जंगली प्राण्याकडून शेतकऱ्यांना धोका होऊ नये यासाठी बोधडी व सावरी शेतीपरिसरासाठी सिंगल फेस लाईट उपलब्ध करून द्यावी अशी मागणी किनवट कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन पाटील यांनी किनवटच्या विद्युत कार्यालयाकडे निवेदन देऊन केली आहे.

बोधडी बु परिसरात बारमाही पिके घेणारे शेतकरी संख्येने जास्त आहेत. रब्बी हंगामात तसेच उन्हाळी पिके घेताना या भागातील शेतकऱ्यांना शेतात जाऊन रात्रभर जागल करावी लागते परंतु बोधडी व सावरी परिसरात शेतीसाठी सिंगल फेस लाईट उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्यांना अंधारात राहूनच पिकाचे संरक्षण करावे लागत आहे कित्येक वेळा रात्रीला या भागात वाघ, अस्वल व सायाळ सारखे हिंस्र प्राणी वावरत असल्याने अशा प्राण्याकडून शेतकऱ्यांच्या जीवितास धोका उद्भवण्याची शक्यता आहे.शेतीपंपासाठी असलेली थ्रीफेस लाईट एक दिवस आड व केवळ ८ तासापुरती असून या विजेचा जागल करणाऱ्या शेतकऱ्यांना उपयोग होत नाही. पिकांच्या रक्षणासाठी जागलीवर असताना शेतकऱ्यांना प्राण्याकडून धोका होऊ नये यासाठी विद्युत कार्यालयाने बोधडी व सावरी भागातील शेतीपरिसरात सिंगल फेस लाईट उपलब्ध करून द्यावी अशी मागणी किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांनी केली आहे.

# मौजे मुंढे तर्फे सावर्डे ग्रामपंचायत कार्यालयाचे भूमिपूजन आ. शेखर निकम यांच्या हस्ते संपन्न

## आ. शेखर निकम यांनी जनसुविधा योजने अंतर्गत १५ लाखाचा निधी मंजूर केला होता




चिपळूण/ प्रतिनिधी: ( विलास गुरव) तालुक्यातील मुंढे तर्फे चिपळूण ग्रामपंचायत कार्यालय इमारती करिता गेले अनेक वर्ष निधी मागणी ग्रामस्थाकडून केली जात होती ग्रामस्थाच्या मागणी नुसार आमदार शेखर निकम यांनी निधी उपलब्ध करुन दिला त्याचे भूमिपूजन संपन्न झाले त्याप्रमाणे गावामध्ये झालेल्या विविध विकास कामाबाबत ग्रामस्थांनी समाधन व्यक्त केले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी उपतालुका प्रमुख दत्ता शेठ गुजर , जि.प. कोकरे गट विभाग प्रमुख श्री संजयराव कदम , कुटरे प .स युवक अध्यक्ष श्री संतोष निकम ,सरपंच श्री.प्रमोद डिके , उप सरपंच श्री . रविद्र साळूखे , ग्रामपंचायत सदस्य श्री संदिप मोरे, सौ.अनन्या चव्हण , सौ . मोरे मॅडम, सौ . मानसी काणेकर , सौ कांबळी मॅडम , मानकरी श्री . दशरथ मोरे , श्री दिलिप मोरे , प्रकाश जंगम , पोलिस पाटील विशाल येडगे , तंटामुक्त अध्यक्ष श्री तुकाराम मोरे , माजी सरपंच श्री राजाराम मोरे, श्री राजेंद्र मोरे , श्री . प्रकाश मोरे , श्री राजाराम चव्हाण , श्री बाळा चव्हाण, श्री प्रभाकर सकपाळ ,श्री . शांताराम चव्हाण , श्री शांताराम डिके , श्री रामचंद्र वनगे , श्री राजाराम सावंत, श्री मोहन काणेकर , श्री मिलिंद जाधव , श्री राजेंद्र साळूंखे , श्री प्रेमचंद मोरे , श्री नरेश यशवंतराव , अमित चव्हाण, श्री लक्ष्मण येडगे , श्री शशिकांत हरेकर , श्री रविंद्र चव्हाण , श्री . सिताराम लांबे , श्री . तुकाराम जो रत , माजी उपसरपंच श्री रणवीर मोरे , ग्रामसेवक श्री . राजेंद्र सुवारे , ग्रा.प . कर्मचारी श्री . शिवराम लांबे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते .

# एसटीला मिळाले फक्त ३०० कोटी

मुंबई : मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात जाहीर केलेली आर्थिक तरतूद अद्यापही एसटी महामंडळाला पूर्ण मिळाली नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्य सरकारकडून फक्त ३०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे.२०२३–२४ च्या अर्थसंकल्पात जवळपास दोन हजार कोटी रुपयांचा निधी एसटी महामंडळाला विविध योजनांमार्फत देण्यात आला होता.एसटी महामंडळाला या वाईट अवस्थेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न सरकारकडून फक्त कागदावरच केला जातोय का? असे प्रश्न निर्माण होत आहेत. त्याचे कारण म्हणजे यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारकडून एसटी महामंडळाला विविध योजनांमार्फत दोन हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला होता. मात्र त्यातील ८० टक्के निधी अद्यापही मिळालाच नसल्याची बाब समोर आली आहे. राज्य सरकारने बसस्थानकांचा दर्जावाढीसाठी जवळपास ४०० कोटी रुपयांची रक्कम दिली होती. मात्र अद्यापही त्याची पूर्ण पूर्तता राज्य सरकारने केलेली नाही. बस खरेदीसाठीचे ९०० कोटी रुपये देखील राज्य सरकारकडे प्रलंबित आहेत.इलेक्ट्रिक बसेससाठी चार्जिंग स्टेशनची उभारणी आणि इतर कामांसाठी जवळपास ६०० कोटींच्या जवळपास रक्कम दिली होती. त्यातील अद्यापही ५० टक्के रक्कम राज्य सरकारकडून येणे बाकी आहे.एसटी महामंडळाच्या ताफ्यात इलेक्ट्रिक गाड्या आल्या जरी असल्या तरी चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी लागणा–या रकमेची पूर्तताच झाली नसल्याने महामंडळाला अडचणींचा सामना करावा लागू शकतो. सोबतच यंदाचे आर्थिक वर्ष संपत असल्याने आणि नव्याने अर्थसंकल्प सादर होणार असल्याने मार्च अखेरपर्यंत पैसे महामंडळाला मिळाले नाहीत तर यावर पाणी सोडावे लागणार आहे. यासंदर्भात एसटी संघटना आक्रमक झाल्या असून त्वरित रक्कम देण्याची मागणी करण्यात येत आहे. एसटीकडे नव्या गाड्या येत नसल्याने महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यास अडचणी निर्माण होत आहेत. नव्याने येणा–या २२०० गाड्यांची वर्क ऑर्डर वेळेवर दिली गेली नाही आणि संबंधित कंपनीला पैसे उपलब्ध करून दिले नाहीत तर गाड्या येऊ शकणार नाहीत. त्यामुळे प्रवाशांना मोडकळीस आलेल्या गाड्यांनीच प्रवास करावा लागू शकतो.एसटीमध्ये मोठं आंदोलन झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात कंत्राटीपद्धतीवर गाड्या आणल्या जात आहेत. याचा प्रवाशांना जरी फायदा होत असला तरी एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीत मोठा बदल झाला नाही. राज्य सरकारने विविध योजना घोषित केल्यावर अनेकदा महामंडळाला त्यांच्याच पैशासाठी हात पसरावे लागत आहेत. अशात किमान अर्थसंकल्पीय तरतूद जरी व्यवस्थित मिळाली तरी प्रवाशांना चांगल्या सुविधा देता येतील.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE